# मुंबई विद्यापीठ

परिक्षा विभाग / निकाल कक्ष
महात्मा फुले भवन
विद्यानगरी परिसर
मुंबई ४०० ०९८

क्र.परिक्षा/निकाल/ 39 /२०१८

परिपत्रकः

विषयः विद्यापीठाच्या घेत असलेल्या जुन्या अभ्यासक्रमातील कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन या विद्याशाखा साठीचे अनुतीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज **D.U.P. वरून ऑनलाईन पध्दतीने mum.digitaluniversity.ac या लिंकवरून** स्विकारण्या बाबत...

संदर्भः १. परिपत्रक क्र.युजी/२७९ दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ व क्र.युजी/२९१ दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७
२. क्र.परिक्षा/फी/१५/२०१८ दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजीचे सुधारीत परिक्षा फी बाबत विद्यापीठाचे निर्देश.

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक संस्थांचे/विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालय/संस्थांचे प्राचार्य/संचालक, प्राध्यापक-संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, विद्यापीठ संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य/समन्वयक आणि विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाचे उपरोक्त संदर्भीय परिपत्रकांनुसार जुन्या अभ्यासक्रमातील कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन या विद्याशाखासाठीचे अनुतीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना एप्रिल-मे २०१८ व नोव्हेंबर-डिसेंबर २०१८ च्या परिक्षेत प्रविष्ठ होण्याची शेवटची संधी देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठाच्या संदर्भीय दिनांक ३१ जानेवारी २०१८ रोजीच्या निर्देशानुसार सुधारित परिक्षा फी लागू करण्यात आली आहे. त्याअनुषगाने जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रथम सत्र एप्रिल-मे २०१८ मध्ये होणा-या खालील नमूद परिक्षामध्ये प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज **Digital University Portal वरून ऑनलाईन पध्दतीने mum.digitaluniversity.ac या लिंकवरून स्विकारण्यात येणार आहेत**.

| Sr. No. | Exam Code | Examinations |
|---|---|---|
| 01 | A0125 | T.Y.B.A. (Sem. V) (CBSGS)(60:40) |
| 02 | A0126 | T.Y.B.A. (Sem. VI) (CBSGS)(60:40) |
| 03 | C0135 | T.Y.B.Com.(Sem.V)(CBSGS)(60:40) |
| 04 | C0136 | T.Y.B.Com.(Sem.VI)(CBSGS)(60:40) |
| 05 | S0125 | T.Y.B.Sc.(Sem.V)(CBSGS)(60:40) |
| 06 | S0126 | T.Y.B.Sc.(Sem.VI)(CBSGS)(60:40) |

| अनु. क्र. | परिक्षा शुल्क | महाविद्यालयाने ऑनलाईन अर्ज भरण्याची व Inward करण्याची तारीख | Form submission Report व विहीत शुल्क विद्यापीठात जमा करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | नियमित शुल्क | ५ मार्च, २०१८ पर्यंत | ७ मार्च २०१८ |
| ०२ | विलंब शुल्क रू १००/- सहित | १० मार्च २०१८ पर्यंत | १३ मार्च २०१८ |
| ०३ | अति विलंब शुल्क रू५००/- सहित | १५ मार्च २०१८ पर्यंत | १७ मार्च २०१८ |

उपरोक्त नमूद केलेल्या तारखांचा तपशिलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे परिक्षा प्रवेशपत्र Digital University Portal वर Inward करून त्यांचे Form Submission Report ची प्रत व विहीत परिक्षा शुल्क परिक्षा विभागात वरील तारखांप्रमाणे हस्तेपोच जमा करावे, पोस्टाने अथवा कुरीअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. प्रवेशपत्रांच्या प्रती (Examination Forms Print ) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.

परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या अंतीम तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत परिक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत वाढवून दिली जाणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१७ करिता परीक्षेत प्रविष्ठ होण्याकरिता विहित शुल्कासह परीक्षा अर्ज सादर केले आहेत व त्यांची परीक्षा झाली नाही त्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही, याची कृपया नोंद घ्यावी

संचालक (प्रभारी)
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

मुंबई ४०००९८
२६ फेब्रुवारी, २०१८

प्रति

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक संस्थांचे/विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालय/संस्थांचे प्राचार्य/संचालक, प्राध्यापक-संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, विद्यापीठ संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य/समन्वयक आणि विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव

*******

(अ) प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना:

१. वित्त व लेखा अधिकारी, फोर्ट, मुंबई ४०० ०३२
२. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
३. सर्व उपकुलसचिव, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, परिक्षा विभाग, मुंबई ४०००९८
४. उपकुलसचिव, वित्त व लेखा, परिक्षा भवन, विद्यानगरी, मुंबई ४०० ००९८
५. उपकुलसविच, जनसंपर्क, फोर्ट परिसर, मुंबई ४०० ०३२
६. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
७. जनसंपर्क अधिकारी, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, परिक्षा विभाग, मुंबई ४०००९८
८. सर्व सहायक कुलसचिव, निकाल कक्ष, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, मुंबई ९८
९. सर्व यंत्रणा परिचालन अधिकारी, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
१०. समन्वयक, एम.के.सी.एल., तिसरा मजला, परिक्षा विभाग, मुंबई ४०० ०९८

(ब) प्रत माहिती करिता रवाना:

१. कुलगुरूंचे स्वीय सहायक
२. प्र कुलगुरूंचे स्वीय सहायक
३. कुलसचिवांचे स्वीय सहायक
४. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्वीय सहायक
५. वित्त व लेखा अधिकारी यांचे स्वीय सहायक